# COMMUNICATION AND MANAGEMENT JOURNAL

An ISO : 9001:2008 Certified Journal

ISSN NO : 2269-7195 / Web : https://cmjjournal.com/

AN UGC - CARE Approved Group - II Journal

Contact : editorcmjournal@gmail.com


# Certificate of Publication

PAPER ID: CMJ -3457

This is to certify that the paper entitled

संत साहत्यिाची सामाजकिता

Authored by


डॉ. देवदिास मल्हारी शेटे

From

सावत्रिीबाई कला महावद्यिालय पपिळगाव पसिा, श्रीगोंदा, अहमदनगर. सावत्रिीबाई फुले पुणे वद्यिापीठ पुणे


Has been published in

Dr. Jane Smith- Editor-In-Chief

CM JOURNAL

Crossref

PRINCIPAL

Savitribai College of Arts

Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

Scanned with CamScanner

# संत साहित्याची सामाजिकता

डॉ.देविदास मल्हारी शेटे
सावित्रीबाई कला महाविद्यालय
पिंपळगाव पिसा,श्रीगोंदा,अहमदनगर.
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.

प्रस्तावना :-

संत साहित्याचा काळ हा भारतातील प्रबोधन काळ आहे.हजारो वर्षापासून वारकरी चळवळीचा मराठी लोकजीवनावर झालेला विलक्षण प्रभाव आजही आबादीत आहे. तसाच तो मराठी साहित्यवरही आहे.संत साहित्याचा अभ्यास केव्हाच मराठी प्रदेशा पलीकडे जाऊन इंग्रजी व इतर विदेशी भाषांमध्ये पोचला आहे.संत साहित्याचे अनेक पैलू आज नव्याने अभ्यासातून पुढे येत आहेत.संत साहित्याची प्रेरणा ही सामाजिक परिवर्तनाचा ध्यास अशीच राहिली आहे.त्यामुळे संत साहित्याचा समाज प्रबोधन व सांस्कृतिक स्वरूप या अंगाने केलेला अभ्यास अधिक महत्वाचा आहे.

संत साहित्याची निर्मिती समाज प्रबोधनाच्या जाणिवेतून निर्माण झाले आहे.त्यामुळे संत साहित्याचा समाजवास्तवतेवर अधिक भर दिसतो. महाराष्ट्र ही संतांची कर्मभूमी म्हणून ओळखली जाते.या कर्मभूमीतील संतांनी महाराष्ट्राच्या विविध प्रदेशात जन्म घेऊन संत ज्ञानेश्वर यांनी स्थापन केलेल्या वारकरी संप्रदायाच्या छत्राखाली येऊन वैश्विक मूल्यांची प्रतिष्ठापना केली आणि माणुसकी धर्माची गुडी उभारणी.गेली शेकडो वर्षापासून याच संतांच्या शिकवणीचे आजपर्यंत पालन होत आहे.काळ बदलला,माणसे बदलली,आधुनिकता आली तरीही संतांनी दिलेली शिकव आजपर्यंत टिकून आहे.या संतांनी मराठी साहित्याला अभंग,भारुड,गवळणी,चरित्र,आत्मचरित्र अशा अनेक प्रकारचे साहित्य प्रकार दिले.'भक्ती' हा प्रधान हेतू असला तरी प्रपंच करून परमार्थाची शिकवण संतांनी जन माणसाला दिली आणि यामुळे सर्वसामान्य माणसानेही भागवत पताका

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar



Scanned with CamScanner

ISSN NO: 2269-7195

उंच उंच फडकवत ठेवली आहे.एक आत्मविश्वास सर्वसामान्य माणसाला त्यांनी दिला.त्यांच्या अभंगामधून सर्वसामान्य माणसाला आपल्या जीवनात आनंद शोधता आला आणि त्याचे जीवनही समृद्ध झाले ते संतांच्या शिकवणीतूनच हे वास्तव सत्य आज आपल्याला नाकारून चालणार नाही.

संत साहित्याचे सामाजिक योगदान पाहता अध्यात्मिक तत्वचिंतनाचे रूपांतर सामाजिक मूल्यांमध्ये घडविणाऱ्या संत परंपरेमध्ये संत ज्ञानेश्वरांचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे.त्यांच्याच विचारांचा वारसा घेऊन संत एकनाथांच्या रूपाने प्रकट झाला,संत तुकारामांनी सामाजिक विकृतींना फटका देत मानवी मनात आणि समाज जीवनात आत्मविश्वास निर्माण केला.संत साहित्य हे मराठी सारस्वताचे एक अनमोल रत्न आहे.संतांची भूमिका ही तत्त्वचिंतनाबरोबरच खऱ्या अर्थाने लोकशिक्षकाची होती.संत हे नेहमी अज्ञान,अविद्या,विकार,विकृती यांच्यापासून दूर राहिले व सर्वसामान्य जनतेलाही त्यांनी दूर ठेवले.सामाजिक आणि अध्यात्मिक जागृती करणे हा त्यांचा मुख्य हेतू होता.सर्वांमध्ये एकात्मता,बंधुभाव निर्माण व्हावा हीच जगत उद्धाराची तळमळ त्यांच्या अभंगवाणीतून ठाई ठाई भरलेली दिसते.म्हणूनच संत तुकाराम म्हणतात **'उपकारासाठी बोलू हे उपाय| येणेविण काय चाड आम्हा|| बुडते हे जन न देखवे डोळा| येतो कळवळा म्हणवोनी||**'यामधून संत तुकारामांची भूमिका प्रबोधनकाराची होती हे स्पष्ट होताना दिसते.

सकल संत हे श्रेष्ठ समाज प्रबोधनकार आहेत.म्हणूनच कधी विनंती करून,कधी भीती दाखवून तर कधी गंभीर परिणामांची जाणीव करून देऊन समाजाला जागे केले आहे.त्यासाठी त्यांनी कीर्तन,भारुड अशी माध्यमे निवडली.प्रपंच आणि परमार्थ,व्यक्ती आणि समाज या सर्वांचा एकत्रित विचार करून मानवी मनाला आणि जीवनाला समृद्धीकडे नेण्यासाठी सावध राहण्याचा उपदेश त्यांनी त्यांच्या अभंगामधून केला त्यामध्ये संत ज्ञानेश्वर,संत नामदेव,जनाबाई,संत मुक्ताबाई,संत गोरा कुंभार,संत चोखामेळा,संतसावता माळी,संत नरहरी सोनार,संत एकनाथ,संत तुकाराम महाराज,संत

PRINCIPAL

Scanned with CamScanner

 ISSN NO: 2269-7195

बहिणाबाई,संत कान्होपात्रा,संत निळोबाराय,संत शेख मोहम्मद आदी अनेक संतांनी महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण देशामध्ये आपल्या अमृतवाणीने आणि कृतीने समाजात ज्ञान जागृती केली.

संत ज्ञानेश्वर माऊली यांनी वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची आचार विचारांची, सामाजिक समतेची मुहूर्तमेड करून भागवत धर्माचा पाया घातला व सर्वसामान्यांसाठी गीतेचे तत्वज्ञान 'ज्ञानेश्वरी' मधून मराठी भाषेत आणले व भक्तीचे द्वार सर्वासाठी खुले केले.गेल्या अनेक वर्षात संत साहित्याचा अनेक अंगाने अभ्यासकांनी व विचारवंतांनी अभ्यास केला त्यामध्ये अनेक विचारवंतांनी संत साहित्याला नाकारले तर काही अभ्यासकांनी संत साहित्याचा भक्ती भावाने स्वीकार केला.संतांनी सांगितलेला भक्तीचा मार्ग हा सर्वसमावेशक आहे हा भक्तिमार्ग समाजात लोकमानसात संतांनी रुजवला म्हणूनच ज्ञानेश्वर माऊली म्हणतात **'जे जे भेटे भूत| ते ते मानिजे भगवंत| हा भक्तियोग निश्चित| जाण माझा||** असा ठामपणे विश्वास त्यांचा होता.संत एकनाथ महाराज यांनी भारुड माध्यमातून जे तत्वज्ञान सांगितले तेही महत्त्वाचे आहे.

संत एकनाथांच्या काळात समाजातील लोकांवर अन्याय,अत्याचार होत होते,यामुळे संपूर्ण समाज भयभीत झाला होता.त्यांचे मानसिक संतुलन बिघडले होते.म्हणूनच समाजाच्या सामाजिक स्वास्थ्यासाठी **"बये दार उघड'** अशी हाक देत भारुडाच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले.

संतांनी सदैव समाज कल्याणासाठी कार्य केले आहे.जीवन कसे जगावे आणि कसे जगू नये याचे ज्ञान त्यांचे साहित्य देते.संत ज्ञानेश्वर यांनी ७०० वर्षापूर्वी वैज्ञानिक गोष्टी नमूद करून ठेवल्या आहेत.या जगात अध्यात्म आणि विज्ञानाच्या समन्वयातूनच शांती नांदेल असा संदेश त्यांनी समाजाला दिला.

PRINCIPAL

Scanned with CamScanner

 ISSN NO: 2269-7195

आज संतांचे साहित्य उपयुक्त मानले जाते कारण संतांच्या साहित्यात विचारांची भव्यता,अंतःकरणाची तीव्रता आणि धार्मिक औदार्य आहे.जे आजच्या सांप्रदायिक संकुचित विचारसरणीच्या कठीण वातावरणात अत्यंत उपयुक्त आहे.

संत साहित्यात अधिक आध्यात्मिक विषय व्यक्त केले गेले आहेत.निर्गुण संतांच्या कवितेने अनेक धार्मिक पंथांचे प्रभाव आत्मसात केले आहेत.अध्यात्मिक साधना आणि काव्यवैभव या दोन्ही बाबतीत संत साहित्य खूप श्रीमंत आहे.संत कवींची विचारधारा वैयक्तिक ज्ञान आणि अनुभवांवर आधारित आहे.

संत ज्ञानेश्वर,मुक्ताबाई,निवृत्तीनाथ,सोपानदेव,एकनाथ,जनाबाई,बहिणाबाई या संतानी वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करून जगाला विश्व कल्याणाचा मार्ग दाखवला.त्यांनी निर्माण केलेले अभंग व गाथा आजही समाजाला दिशादर्शक ठरत आहेत.संत एकनाथ यांनी जातिभेद दूर करण्यासाठी यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. याबरोबरच त्यांनी भावार्थ रामायण,अभंग,गवळणी व भारुड यांची रचना केली.ते खरे लोकशिक्षणकार होते.भारुडाच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रातील लोकांच्या प्रबोधनाचे महत्त्वाचे काम केले. संत ज्ञानेश्वरानंतर संत नामदेव यांनी वारकरी संप्रदायाच्या प्रचार व प्रसार त्यांनी ५० वर्षे केला.संत शिरोमणी' असे यथार्थ संबोधन त्यांच्याबद्दल वापरले जाते.भगवद्भक्तांच्या व साधु-संतांच्या चरण धुळीचा स्पर्श व्हावा म्हणून पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराच्या महाद्वारी 'पायरीचा दगड' होण्यात त्यांनी धन्यता मानली.संत जनाबाई यांनी बाराव्या शतकात इतक्या परखडपणे तथाकथित लोकांना त्यांच्या अभंगांतून समज दिली आहे.संत जनाबाई या वारकरी चळवळीतील अत्यंत बंडखोर स्त्री संत म्हणून ओळखल्या जातात.

संत साहित्याचे सामाजिक योगदान म्हणजे सगुण,निर्गुण,परमेश्वर,आत्मा,सत्य, असत्य,देह,भक्तीयोग,समाधी,आनंद,निराकार,मूर्त,अमूर्त,हे जीवन जगत असताना कसे अनुभवावे हे संतांनी शिकवले.यामधूनच समाजप्रबोधनाचे कार्य सर्व संतांनी केले आहे. ज्ञानेश्वरी,भागवत,रामायण,गीता,हे आपल्या जीवनाचे मार्गदर्शक ग्रंथ आहेत.**एक तरी ओवी अनुभवावी'** हे ज्ञानेश्वरांनी सांगून ठेवले आहे.सर्वच संतांनी समाज प्रबोधनाचे

PRINCIPAL

Scanned with CamScanner

भरीव असे सामाजिक कार्य करून ठेवले आहे.तो वारसा आपणाला पुढे चालवायचा आहे.तोही,आपल्याच समाजाच्या कल्याणासाठी आनंदसाठी संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात सांगितल्याप्रमाणे **'हे विश्वचि माझे घर'** ही उक्ती आपले ब्रीदवाक्य व्हायला हवे.संतांनी याला मंत्राची ताकद दिली.या ताकतीच्या जोरावरच हे विश्व एकजीव होणार आहे.या जगात **'बंधुभाव नित्य वसु दे'** ही उक्ती खरी करून दाखवायची आहे.संतांचे कार्य पुढे चालू ठेवायचे असेल तर हेच आपले ध्येय व्हायला हवे.कारण यातच संपूर्ण मानव जातीचे कल्याण आहे.हीच संतांची शिकवण आपण जोपासली पाहिजे.संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम,संत रामदास,सोपान,सत एकनाथ,संत जनाबाई,संत बहिणाबाई,संत नामदेव,आधी संतांनी समाजप्रबोधनाचे मंदिर बांधून ठेवले आहे.त्याचे जतन करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.ती आपल्याला पार पाडावयाची आहे.त्यासाठी डोळ्यात तेल घालून आपण सज्ज राहायला हवे.


१) 'संत,लोक आणि अभिजन'- रा.चि.ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
२) 'संत साहित्याचे सामाजिक योगदान'- डॉ. रामचंद्र देखणे.
३) 'आधुनिक संत आणि समाज'-रवींद्र गोळे,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
४) 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती फलश्रृती'-गं.बा.सरदार,लोकवाङ्मयगृह.
५) 'संत साहित्यातील सामाजिकता'- डॉ.तानाजी राऊ पाटील,विश्वकर्मा पब्लिकेशन.


PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar



Scanned with CamScanner